शासन वि.समाधान

**निशाणी क्रमांक ३१**

सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की,

नाव : **रेवाप्पा आनंदा चंदनशिवे,**

वय : ८१ वर्ष,

व्यवसाय : निरंक

राहणार : काक्रंबा ता. तुळजापुर जि. धाराशिव.

**सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती. डि. डि. जगताप यांच्या मार्फत**

**सरतपास–**

१. घटना सन २०२० साली सकाळी १०.०० ते ११.०० च्या सुमारास पिंटु साबळे यांच्या घराजवळ काक्रंबा येथे घडली. त्यावेळी मी पिंटु साबळे यांच्या घराजवळून जात असताना लक्ष्मण चंदनशिवे,समाधान चंदनशिवे व आनंद चंदनशिवे यांच्यामध्ये भांडण चालु होते. त्यावेळी समाधान चंदनशिवे व आनंद चंदनशिवे हे लक्ष्मण चंदनशिवे यांना काठीने मारत होते. सदर भांडण मी सोडविले. त्यानंतर लक्ष्मण चंदनशिवे यांची पत्नी तेथे आली व लक्ष्मण यांना तेथून घेऊन गेली. मी त्यावेळी गुन्हयात वापरलेल्या काठ्या पाहील्या होत्या. मला सदर काठ्या दाखविल्यास त्या मी ओळखू शकतो. आता मला जी. एम. आर. क्रमांक ४८/२०२४ वरील काठ्या आर्टिकल 'अ' व आर्टिकल 'ब' दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहेत. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**उलट तपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्रीमती. एस. टी. पवार यांच्या मार्फत–**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे माझ्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझे भांडण आहे. हे म्हणणे खरे नाही की,

शासन वि.समाधान

**निशाणी क्रमांक ३१**

आरोपी सोबत माझी बोलचाल नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यावर दारुच्या केसेस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, भांडण कशावरुन झाले होते हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खेडे गावातील घरामध्ये आर्टिकल 'अ' व 'ब' सारख्या काठ्या असतात.

३. हे म्हणणे खरे नाही की, घटना सन २०२० साली सकाळी १०.०० ते ११.०० च्या सुमारास पिंटु साबळे यांच्या घराजवळ काक्रंबा येथे घडली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी पिंटु साबळे यांच्या घराजवळून जात असताना लक्ष्मण चंदनशिवे,समाधान चंदनशिवे व आनंद चंदनशिवे यांच्यामध्ये भांडण चालु होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी समाधान चंदनशिवे व आनंद चंदनशिवे हे लक्ष्मण चंदनशिवे यांना काठीने मारत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर भांडण मी सोडविले व त्यानंतर लक्ष्मण चंदनशिवे यांची पत्नी तेथे आली आणि तिने लक्ष्मण यांना तेथून नेले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात आरोपी विरुध्द सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

दिनांकः– १३/०१/२०२६.

श्रवणोत्तर स्वीकृत

VIVEK VITHALRAO NIVGHEKAR

Digitally signed by VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Date: 2026.01.13 15:08:16 +0530

(व्ही. व्ही. निवघेकर)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग तुळजापूर